जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

भ्रमरध्वणी क्र.9819208279

प्रेसनोट दि.११.१०.२०२४

## ''सन २०१५ मध्ये झालेल्या खुनाच्या गुन्हयातील आरोपीस जन्मठेप''

सन २०१५ मध्ये आरोपी अमितकुमार लवकुश मोरया याने फिर्यादी मयत सायदा अकबर शेख, वय २५ वर्षे यांस तीने आरोपीसोबत लग्न करण्यास नकार दिल्याच्या कारणावरून धारदार शस्त्राने हल्ला करून तिचा खुन करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावरून सदर आरोपी याचेविरूध्द महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I १७/२०१५, भा.द.वि. कलम ३०७,५०४,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. उपचारादरम्यान सदर फिर्यादी यांचा मृत्यु झाल्यामुळे गुन्हयात भा.द.वि.कलम ३०२ वाढविण्यात आले होते. सदर गुन्हयाचा तपासात तत्कालिन वपोनि/श्री.विजय भिसे व त्यांचे पथकाने भक्कम पुरावे गोळा करून दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर केले होते.

सदर गुन्हयाची सुनावणी मा.श्री.वाघमारे साहेब, जिल्हा व अति. सत्र न्यायालय, कल्याण–१ यांनी घेवुन खुनाच्या गुन्हयातील आरोपी अमितकुमार लवकुश मोरया यास भा.द.वि. कलम ३०२,५०४,५०६ प्रमाणे दोषी ठरवुन आजीवन कारावास (जन्मठेप) व १०,०००/– रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सदर खुनाच्या गुन्हयाच्या संदर्भात सरकारच्या वतीने सरकारी अभियोक्ता श्रीमती रचना भोईर, तत्का.वपोनि/श्री. विजय भिसे, वपोनि/श्री.ज्ञानेश्वर साबळे, पोउपनि/बी.एन.शिंदे, सपोउपनिरी/आटपाडकर, मपोना/झोलेकर, नेम.महात्मा फुले चौक पोलीस ठाणे यांनी अथक परिश्रम करून मा.न्यायालयात ठोस पुरावे सादर केले व त्यामुळे उपरोक्त गुन्हयातील आरोपीला दोषी ठरविण्यात यश आल्यामुळे सदर उत्कृष्ठ कामगिरीबाबत पोलीस दलात व समाजातील सर्व स्तरातुन पोलीसांचे कौतुक होत आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर